स्त्री-जीवन

साने गुरुजी

रिया पब्लिकेशन्स्

स्त्री-जीवन : साने गुरुजी

प्रकाशक
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

अक्षरजुळणी
रावजी देसाई

मुखपृष्ठ
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

मुद्रक
ॐकार मुद्रणालय, कोल्हापूर.

आवृत्ती
१५ ऑगस्ट, २०११

किंमत
रुपये ३२०/-

© सदर पुस्तकातील मजकुराचा हक्क मुक्त आहे; परंतु या पुस्तकातील मांडणी, मुखपृष्ठ किंवा एकंदरीत रचना यांची नक्कल करता येणार नाही, तसेच ट्रेसिंग किंवा निगेटिव्हच्या साहाय्याने छापताही येणार नाही. तसे आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

स्त्री-जीवन

दोन शब्द

(पहिल्या भागाच्या प्रथमावृत्तीची प्रस्तावना)

स्त्रियांनी स्वत:चे असे सुंदर अभिजात वाङ्मय निर्मिलेले आहे. कहाण्या, उखाणे, गाणी, ओव्या हे सारे स्त्रीवाङ्मय आहे. कहाण्यांना तर प्रो. पोतदार यांनी लहान लहान उपनिषदेच म्हटले आहे. या कहाण्यांचा माझ्यावर अपार परिणाम झालेला आहे. माझ्या लिहिण्यातील सहृदयता व साधेपणा कहाण्यांपासून मला मिळालेला आहे. कहाण्यांचा मी ऋणी आहे. उखाणेही फार काव्यमय असतात. सूचकता हा जर काव्याचा आत्मा असेल तर हे उखाणे उत्कृष्ट काव्याचे नमुने म्हणून समजायला हरकत नाही. स्त्रियांची लहानमोठी हजारो गाणी आहेत. त्यात पौराणिक आख्याने आहेत, संसारातील सुखदु:खे आहेत, देहावरच्या गाण्यातून अध्यात्मपर विचार आहेत. काही काही वटसावित्रीसारखी अतिपवित्र प्रदीर्घ गाणी कोणत्याही महाकाव्याच्या तोडीची आहेत. वटसावित्रीचे गाणी बी. ए. च्या मराठीच्या अभ्यासाला अवश्य ठेवण्यासारखे आहे.

परंतु ज्या वाङ्मयात स्त्रियांनी आपला आत्मा संपूर्णपणे ओतला आहे असे वाङ्मय म्हणजे ओवीवाङ्मय. जात्यावर दळताना, पाळणा हलवताना, मुलाला खेळवताना, थोपटताना, झोपाळ्यावर झोके घेताना या ओव्या सहजस्फूर्तीने रचल्या गेल्या आहेत. या ओव्यांतील अकृत्रिम सहृदयता अपूर्व आहे. या ओव्यांत वत्सलतेचा सिंधू आहे. कोठे कोठे विनोदाची सुंदर छटाही आहे. इतरही रस इतस्तत: मर्यादेने उभे आहेत.

एकीच्या ओवीने दुसरीला सुचली असे पुष्कळदा या ओव्यांची निर्मिती होताना झालेले असावे. उदारहणार्थ, ''बोरीबंदरावरी । मड्डम खाते केळे'' अशी ओवी एकीने म्हटली की, दुसरी म्हणे, ''बोरीबंदरावरी । मड्डम खाते पेरू'' तिसरी म्हणे, ''मड्डम खाते बिस्किट.'' काळी चंद्रकळा, तिन्हीसांजा झाल्या, पहिली माझी ओवी,

सासरचे बोल, दुष्ट, लक्ष्मी की आली वगैरे प्रकार आले की लागोपाठ त्याच प्रकारच्या ओव्या भराभर येतात. मुली झोपाळ्यावर बसलेल्या असाव्यात आणि असे हे काव्यनिर्मितीचे गोड प्रकार होत असावेत. या ओव्या तोंडोतोंडी आलेल्या आहेत आणि सदैव त्यात भरच पडत आलेली आहे. महाराष्ट्रातील बायका दळताना, कांडताना ओव्या म्हणतात, असे फार प्राचीन सातव्या-आठव्या शतकातील उल्लेख आहेत.

या ओव्यांत पुष्कळशा ओव्या साडेतीन चरणी आहेत. काही चार चरणी आहेत. साडेतीन चरणी दुसऱ्या व तिसऱ्या चरणांचे अंती यमक असते. चार चरणांत दुसऱ्या व चौथ्या चरणाच्या शेवटी यमक असते. चार चरणी बहुधा जात्यावरच्या असतात. या ओव्या म्हणण्याचे विशिष्ट प्रकार आहेत. ते बायकांपासूनच शिकावे व ऐकावे. काही चाली अति गोड असतात. ओव्यांच्या शेवटी बहुधा कोणाचे तरी नाव घालायचे असते. म्हणणाऱ्याने आपल्या आवडीचे कोणाचेही घालावे. मी गोपूबाळ व उषाताई ही दोन नावे बहुतेक सर्व ओव्यांतून घातली आहेत. वाचकांनी तेथे वाटेल ती घालावी.

कहाण्या, उखाणे, गाणी, ओव्या व लोककथा यांचा बालपणापासून मला फार हव्यास. माझे वडील फार उत्तम गोष्टी सांगणारे म्हणून प्रसिद्ध होते. लहानशी गोष्ट असावी; परंतु ते अर्धा तास, तासभर पुरवीत. आम्हाला हसवीत, रडवीत, बोध देत. माझ्या आईच्या आईला वटसावित्री येत असे. सावित्री व्रताचे वेळी ती म्हणायला जात असे व घरीही म्हणत असे. मी ते गाणे जिन्यात बसून ऐकत असे. माझ्या दुसऱ्या एका आजीला अशीच सुंदर गाणी येत होती. आजी व आई दळीत असल्या म्हणजे मी पुष्कळ वेळा ''माझ्या नावाच्या ओव्या म्हणा'' म्हणून हट्ट धरून बसत असे. मग आजी, काकू शेवटी शेवटी पंढरीनाथ असे माझे नाव घालून ओव्या म्हणत. त्या ओव्या माझ्या कानांत आजही गुणगुणत आहेत.

शाळा कॉलेजात असताना जर्मनीतील ''ग्रीम'' बंधुद्वयाप्रमाणे आपणही महाराष्ट्रभर हजारो खेड्यांतून हिंडावे, गाणी, ओव्या, उखाणे, गोष्टी हे वाङ्मय जमा करावे, असे माझ्या मनात येत असे. ''मराठी साहित्याचा फकीर'' हे ध्येय मनात येई. मुक्तेश्वरांनी ''एकेक अक्षराची भीक'' मागून अमर वाङ्मय निर्मिले. मी निर्माण न करू शकलो तरी असे अमर वाङ्मय मरू लागले आहे, नष्ट होऊ लागले आहे, ते संग्रहीत करावे असे वाटे. मनातील हेतू सारे थोडेच साध्य होतात ! आणि ध्येय तरी का सदैव एक असते? लहान मुलाला यात्रेत दिसेल ते घ्यावेसे वाटते, तद्वत माझी स्थिती आहे. हे करावे, ते करावे, सारेच वाटते आणि म्हणून कोठलेच नीट होत नाही व त्यामुळे हृदय फाटते व चित्त दाटते.

मी कधी कोठे गेलो व मायबहिणी भेटल्या तर ओव्या म्हणायला सांगत असे, परंतु टिपून घेत नसे. १९३१ पासून टिपून घेऊ लागलो. १९३४ मध्ये ज्यांच्याकडे मी लहानपणी पुण्याला शिकायला होतो त्या माझ्या उंबरगावच्या डॉ. रामचंद्र काशीनाथ जोशी यांच्या आई श्रीमती सुभद्राबाई जोशी यांच्याजवळून मी पुष्कळ टिपून घेतल्या. 'लग्नातील सांगा, दृष्टीच्या सांगा, पावसाच्या सांगा' मी असे सुचवी व त्यांना आठवत. जवळजवळ ४०० ओव्या त्यांचेजवळ मी घेतल्या. पुढे अलिबागेस माझी बहीण ती. सौ. लक्ष्मीबाई भिडे ही आहे. आमची ही सर्वांत मोठी बहीण, एकुलती बहीण. मी तिला ओव्या विचारी, ती सांगे. ती मग शेजारच्या शेजीबाईंना बोलवी व ''आमच्या अण्णाला सांगा ओव्या'' म्हणून प्रार्थी. मग काय तेथे लहानमोठ्या मायबहिणी जमायच्या व मी भराभर टिपून घ्यायचा. सांगता सांगता कधी त्या गहिवरत, कधी थोड्या लाजत, कधी हसत. मी म्हणायचा, ''काय छान आहे ही ओवी.'' त्यांना आनंद वाटे व उत्साह येई. माझ्या बहिणीच्या मुलीही ओव्या गोळा करू लागल्या व आणून देऊ लागल्या. जवळ जवळ १२०० ओव्या मला तेथे मिळाल्या. बडोद्याला माझी मावशी आहे व मामी आहे. तेथे मी सुरू केला प्रचार. दुपारी तांदूळ वगैरे निवडताना शेजारच्या बायका जमत व मी माझी वही-पेन्सिल घेऊन बसे जवळजवळ २०० ओव्या मजजवळ नसलेल्या मिळाल्या. अमळनेरला १००-१५० मिळाल्या आणि कोकणातील माझ्या पालगड गावी जवळ जवळ ५०० ओव्या मिळाल्या. असा हा अडीच हजार ओव्यांचा संग्रह जमा होऊन पडला होता. त्याचे वर्गीकरण वगैरे करायला वेळ कोठून होणार?

'सह्याद्री' मासिकातील सईचे लग्न, 'प्रतिभे'मध्ये आलेल्या ओव्या, 'शालापत्रक', 'आनंद', 'खेळगडी' वगैरे मासिकांतून लोकगीते या सदराखाली येणाऱ्या ओव्या यांचा संग्रह मला करता आला नाही. मला वेळच नाही या माझ्या संग्रहातील काही ओव्या त्यातून येऊन गेल्या असतील. काही नसतील. 'न्हाणुलीच्या ओव्या' वगैरे छोटी पुस्तके मी लहानपणी पाहिली होती; परंतु आता वेळ झाला नाही. जर कधी

रिकामपण मिळाले तर प्रसिद्ध झालेल्या सर्व ओव्यांची या संग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचा सुयोग आला तर त्यांत भर घालीन; परंतु मला वेळ न झाला तर जो कोणी मराठी साहित्याचा उपासक असेल त्याला माझ्या या संग्रहाचा उपयोग होईल.

अडीच हजार ओव्यांचे मी निरनिराळे प्रकार पाडले. भाऊबहिणींच्या, मायलेकरांच्या, मुलगीसंबंधी, संसारातील सुखदु:खे, हे चार पहिल्या भागात देत आहे. उरलेले प्रकार दुसऱ्या भागात देणार आहे. दुसऱ्या भागात पौराणिक, ऐतिहासिक, सृष्टिवर्णनपर, तीर्थक्षेत्रे, पुरे-पट्टणे, पहिली माझी ओवी, सुभाषिते व संकीर्ण असे प्रकार आहेत. दोन्ही भाग एकत्र केले असते तर पृष्ठे वाढती व आज कागदाची महर्गता असल्यामुळे किंमत अधिक ठेवावी लागली असती व ती एकदम देणे जड झाले असते.

या पहिल्या भागात जवळजवळ दीड हजार ओव्या आल्या आहेत. उरलेल्या हजारांचा दुसरा भाग होईल. प्रत्येक प्रकाराला मी रसपरिचय जोडला आहे. दिग्दर्शक आहे. ओव्या म्हणजे आपले काही तरी, असे कोणास वाटू नये म्हणून तसे केले आहे.

या ओव्यांतील माधुर्याबद्दल मी काय सांगू? त्यातील भावनोत्कटतेविषयी काय लिहू? माझी बहीण ओव्या सांगताना रडली आहे.

माझे की आयुष्य
उणें करी रे गण राया
घाल सखीच्या चुडेया
मनुताईच्या

ही ओवी सांगताना तिचे डोळे पाण्याने भरले. आई आपले आयुष्य मुलीच्या नवऱ्याला देत आहे. केवढा प्रसंग ! ''मला भावाच्या ओव्या फार आवडतात'' माझी बहीण म्हणायची. येवले, मुंबई, अहमदाबाद, अमळनेर वगैरे शहरी या ओव्यांवर गणेशोत्सवात वगैरे मी व्याख्याने दिली. काव्यमय ओव्या ऐकून स्त्री-पुरुष लहानथोर माना डोलवीत व सद्‌गदित होत, हे मी पाहिले आहे. माझ्या वह्या पाहावयास मागत. बायका व मुली विचारीत, कोठून आणल्यात ह्या ओव्या? मी उत्तर देई, ''हे तुमचेच जुने ठेवणे आहे. तुम्हाला मी देत आहे.''

अमळनेरचे एक शिक्षक या ओव्या वाचीत होते. त्यांच्या बहिणीचे, नुकतेच लग्न झाले होते. मुलगी सासरी जात आहे. भाऊ 'ये हो' म्हणत आहे. सासरचे हाल वगैरे ओव्या ते वाचू लागले व रडू लागले. मी त्यांना विचारले, ''काय झाले?'' ते म्हणाले, ''आताच बहिणीचे लग्न झाले. अनुभव ताजा आहे.'' आगगाडीतून नगरकडे जाताना एक गृहस्थ डब्यात होते, त्यांनी वाचायला घेतल्या ओव्या. शेवटी म्हणाले, ''कधी होईल पुस्तक? कोठे मिळेल?'' मी म्हटले, ''छापणार आहे लवकरच. सर्वत्र मिळेल.'' धुळ्याहून मालेगावला मोटारीतून जात होतो. शिरपूरचे एक तरुण होते. लॉरीत मजजवळून त्यांनी वही घेतली. ते तन्मय होऊन वाचीत होते, दोनदोनदा म्हणत होते. शेवटी मला म्हणाले, ''पुरे, आता वाचवत नाही.'' 'मन्वंतर' मासिकात बहीण-भावंडांच्या ओव्यांचा व मायलेकरांच्या ओव्यांचा रसपरिचय जानेवारी व फेब्रुवारी १९४० च्या अंकातून देण्यात आला होता, अमळनेरच्या किती तरी भगिनींनी ते अंक घरी आणून वाचले. अमळनेरला श्री. अनंतराव गुप्ते म्हणून एक प्रसिद्ध सज्जन वकील आहेत त्यांना त्यांच्या आप्तमित्रांकडून 'मन्वंतरा'चे हे अंक वाचा अशी पत्रे आली आणि सुप्रसिद्ध कलावान हंस पिक्चर्सचे पार्टनर श्री. विनायक कर्नाटकी यांचे कोल्हापूरहून एक दिवस मला अचानक पत्र आले ते मुद्दाम देतो :

३१ जानेवारी १९४०

गु. साने गुरुजी यांचे सेवेशी
सादर प्रणिपात–

आपली व माझी ओळख नाही ! माझं दुर्दैव की यापूर्वी मी आपले लिखाणही वाचू शकलो नाही? अगदी अनपेक्षित 'मन्वन्तरा'चा अंक हाती आला ! 'मायलेकरे' या लिखाणातील रस चाखू लागलो ! वाचता वाचता अक्षरश: हृदय भरून आले. मला नकळत डोळ्यांवाटे अश्रू वाहू लागले ! जो भेटेल त्याला मी सांगितले, हे लिखाण वाचा ! पोथी-पुराण वाचून पापंसुद्धा धुतली जातील असं आपण वाचतो, पण हे वाचताना या मंगल बालवेदांच्या पठणाने ती धुतली जातात, असा प्रत्यक्ष अनुभव येऊ लागतो! वात्सल्यानं हृदय भरून येतं! आसमंतात मांगल्य दरवळून येतं!

विद्वतेने भरलेल्या पुस्तकांतून-ग्रंथांतून जी कल्पना येत नाही ती हिंदूधर्माच्या संपन्न हृदयाची कल्पना आपल्या या लेखांकातून येत आहे. जिला आपण 'आपली संस्कृती, आपली संस्कृती' म्हणून डोक्यावर घेऊन नाचायला हवं ती ही!

आपल्या संस्कृतीची ही संपदा विसरली जात आहे ! आपण ही संपदा गोळा करून आम्हाला दाखवीत आहात ! आम्ही सदैव तुमचे ऋणी राहू!

आपला नम्र
'विनायक'
हंस पिक्चर्स, कोल्हापूर

आपण सारे त्या मायबहिणीचे ऋणी राहू या. त्यांनी 'माझे नामरूप हरपो' या वृत्तीने हे वाङ्मय निर्माण केले. श्री. विनायकांसारख्या, कलेशी तन्मय झालेल्या कलोपासकाचा या ओव्यांवरील हा अभिप्राय आहे.

मी तर केवळ निमित्तमात्र आहे. या ओव्या ऐकताना जणू काही समाधी लागे. या वाचताना मी वेडा होतो. वेळ असला, म्हणजे हे वेद वाचतो. पुन्हापुन्हा वाचतो. ज्या आईने व आजीने लहानपाणी ही गोडी लाविली. त्यांचे हे उपकार.

ज्या भगिनींनी मला या ओव्या आनंदाने सांगितल्या. त्यांचे मी कसे आभार मानू ! मुले रडत आहेत, घरात कामे आहेत. तिन्हीसांजा होत आलेल्या तरीही मला ओव्या सांगत त्या बसत. माझ्या मित्राची आई श्री. सुभद्राबाई आज नाहीत. त्यांच्या स्मरणशक्तीसारखी अपूर्व स्मरणशक्ती मी पाहिली नाही. त्यांना 'नवनीत' कितीतरी पाठ. किती गाणी येत, किती ओव्या येत. त्यांना मीही आईच म्हणत असे. मातृहीनाला मला त्यांनी सतत मातृप्रेम दिले. त्यांचे आज कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो. त्यांनी किती ओव्या दिल्या. नंतर अलिबागची माझी बहीण ती. सौ. लक्ष्मीबाई भिडे नंतर तिच्या मुली सौ. रंगुताई रिसबूड, सौ. सुंदराताई गोगटे, सौ. मनुताई थत्ते, कु. कमल भिडे; बहिणीच्या उदार व प्रेमळ शेजारणी सौ. भागीरथीबाई फाटक, सौ. उमाबाई देवधर, सौ. लक्ष्मीबाई घारपुरे, कु. रंगू नवरे व सौ. भागीरथीबाई नवरे; गं. भा. राधाबाई ओक, गं. भा. गंगाबाई फडके, गं. भा. सईबाई मोघे; बडोद्याची माझी मावशी सौ. सखूबाई आपटे व मामी सौ. रुक्मिणीबाई परचुरे व त्यांच्या मैत्रिणी आणि शेजारणी माझ्या कोकणातील पालगड गावच्या ती. सौ. अन्नपूर्णाकाकू साने, ती. सौ. जानकीवहिनी साने, कै. ती. सौ. लक्ष्मीबाई साने, सौ. कमलाबाई डिंगणकर, सौ. कुशाताई जोशी, सौ. शंकुतला ओक, गं. भा. चंद्रताई करंदीकर व करंदीकर घराण्यातील आणखी भगिनी, माझ्या आईची चुलती सौ. भागीरथीबाई परचुरे. माझ्या वहिनीच्या बहिणी सौ. अंबू पेंडसे व श्री. शकुंतला व तिच्या भावजया, सौ. कमलाबाई जोशी वगैरे; अमळनेरच्या सौ. माई वैद्य व इतर काही मुली; अशा कितीतरी लहानमोठ्या मायबहिणींपासून मी ओव्या गोळा केल्या. काहींची नावे मला आठवत नाहीत; परंतु त्यांचे कृतज्ञ स्मरण आहे. या सर्व भगिनींचा मी ऋणी आहे. हा संग्रह त्यांनी मला दिला व मी लिहिला. त्यांनी दिलेल्या ओव्यांच्या भावभक्तीने मी लेखक झालो.

या ओव्या ब्राह्मणवर्गात प्रचलित असलेल्या आहेत. प्रत्येक जातीत व निरनिराळ्या जिल्ह्यांतून अशा हजारो ओव्या असतील. नगरला मी एक दिवस उजाडता जात होतो, तर एक मुसलमानाबाई 'मिय्या बिबी बोले' वगैरे चरण असलेली ओवी म्हणत होती. नावरानावरी गावी मी आश्रमात होतो तेथे शेजारी असलेल्या मुसलमान मायबहिणी गंगाजमुनांच्या ओव्या दळताना पहाटे म्हणत. खानदेशात चहाडी येथे पहाटे किसान बाया दळताना ओव्या म्हणत असत. मी ऐकल्या होत्या त्या त्या जातीतील सुखदु:खे, अनुभव त्यांच्या त्यांच्या ओव्यांतून असणार हे सारे वाङ्मय जमा केले पाहिजे. सर्व जातींतील मायबहिणींजवळून प्रेमस्नेहाने मिळविले पाहिजे. 'स्त्री-जीवना'ची शेवटची प्रत माझी वहिनी मरणशय्येवर असताना मी करीत होतो. वहिनी मरणशय्येवर असतानाही मी तिला म्हणे- ''वहिनी, आठवते का एखादी ओवी?'' ती प्रयत्न करी व म्हणे 'भावोजी, नाही आठवत हो 'परंतु' एके दिवशी तिने एक ओवी सांगितली मरणाचे आधी दोनच दिवस.'

पालगड गावाचा
टाकी लावून रस्ता फोडा
रंगीत गाडी धाडा
भाईरायाला ।।

भावाला आणण्यासाठी रस्ता दगडाधोंडाळ म्हणून गाडी पाठवता येत नसेल. तर दगड फोडून रस्ता तयार करा व भावाला गाडी पाठवा. अशी ही भ्रातृप्रेमाची

अमर ओवी तिने मला दिली. मरता मरताही माझ्या वहिनीने अमर स्त्री वाङ्मय दिले. तिच्या आत्म्याला प्रणाम.

'स्त्री-जीवन' या नावाऐवजी 'स्त्री-हृदय' असे नाव असते तर चांगले झाले असते असे काही मित्र म्हणाले; 'स्त्री-जीवन' हे नावच छापले गेले त्याची सूचना अधिक यथार्थ होती. 'स्त्री-जीवन' हे पुस्तक मुलींच्या शाळांतून तरी सर्वत्र जाईल व आपल्या मायबहिणी असे अमर वाङ्मय निर्मित हे पाहून मुलींना स्फूर्ती येईल व नवीन जीवनावर त्या नवीन वाङ्मय निर्मितीतील अशी मी आशा बाळगतो.

'स्त्री-जीवना'तील 'बहीण-भाऊ' व 'माय-लेकरे' या ओव्यासंबंधीचे रसपरिचयात्मक लेख 'मन्वंतर' मासिकाने आधी प्रसिद्ध करून जनतेचे लक्ष वेधून घेतले याबद्दल त्यांचे आभार मानतो. श्री. दयार्णव कोपर्डेकर यांच्या उत्साही पत्नी चि. सौ. कमल कोपर्डेकर स्त्रियांच्या अभिमानाने हे पुस्तक प्रकाशावयास पुढे आल्या म्हणून त्यांनाही धन्यवाद.

२४/२/१९४०

लिमयेवाडी, सदाशिव पेठ, पुणे-२ **साने गुरुजी**

दोन शब्द

(भाग २)

स्त्रियांच्या ओवी वाङ्मयाचा पहिला भाग काही महिन्यांपूर्वी 'स्त्री-जीवन' या नावाने मी प्रसिद्धीसाठी दिला. आज हा दुसरा भाग देत आहे. पहिला भाग सर्व स्त्री-पुरुषांना आवडला. नव्याजुन्या सर्वांना आवडला. खेड्यापाड्यांत हे पुस्तक गेले. शहरातील सुशिक्षित स्त्रीपुरुषांनीही ते प्रेमाने कवटाळले. जेथे जेथे महाराष्ट्र समाज पसरला आहे तेथे तेथे 'स्त्री जीवना'चा पहिला भाग गेला. अनेकांची सहृदय पत्रे आली. अनेकांनी त्यातील अभिजात काव्याची मुक्तकंठे प्रशंसा केली. माझे थोर गुरुजी, प्राध्यापक पोतदार, नाशिक येथे मी गीतेवर प्रवचने देण्यासाठी गेलो असता मला म्हणाले, ''या ओव्यांवरच द्या ना प्रवचने ! आणि दुसरा भाग लवकरच प्रसिद्ध करा.''

श्री. पोतदारांना पहिल्या भागापेक्षाही दुसरा भाग हवा असेल. कारण या दुसऱ्या भागात ऐतिहासिक ओव्यांचे प्रकरण येणार होते.

आज स्त्री-जीवनाचा हा दुसरा भाग महाराष्ट्राला मी देत आहे. मी गोळा केलेल्या ओव्या जनतेला देऊन मी मोकळा होत आहे. घाईघाईने या भागातील प्रकरणांना मी रसपरिचय लिहून जोडले. राष्ट्रात लढ्याचे वातावरण आहे. सत्याग्रह सुरू आहे. या वेळेस लिहावयास सवड कोठे? परंतु दोन दिवस काढून हा दुसरा भाग पुरा करून दिला आहे. म्हणजे मला जरी तुरुंगात कदाचित जावे लागले तरी भाग प्रसिद्ध होण्यास अडचण होणार नाही.

माझे मित्र भाई गोरे या सर्व ओव्यांचा अभ्यास करून समाजस्थितीविषयक एक निबंध या दुसऱ्या भागात घालण्यासाठी देणार होते; परंतु त्यांना वेळ झाला नाही. ओव्या महाराष्ट्रासमोर आहेत. कोणीही त्यांचा अभ्यास करावा व निबंध लिहून प्रकाश पाडावा.

ओव्यांचा जो पहिला भाग मागे प्रसिद्ध झाला, त्याच्या प्रस्तावनेत मी म्हटले होते की, या ओव्या पांढरपेशा समाजातील आहेत. समाजातील प्रत्येक जातीत अशा प्रकारचे स्त्रीवाङ्मय असेल ते गोळा केले पाहिजे. काही लोकांना तशी स्फूर्ती मिळाली आहे असे कळते. अमळनेर तालुक्यातील नांदेड गावाच्या एका तरुणाने लेवापाटीदार समाजातील स्त्रियांच्या ओव्या गोळा केल्या आहेत असे कळते. तिकडे यावल-रावेरी बाजूला प्रसिद्ध लोकसेवक श्री. धनाजी नाना चौधरी यांच्या खिरोदे वगैरे भागात तरुण मुलामुलींनी चारपाचशे ओव्या जमविल्या आहेत असे कळते. सर्व वर्गातील स्त्री-पुरुषांना परंपरेने आलेले हे गोड ओवी-वाङ्मय गोळा करण्याची स्फूर्ती जर माझ्या या स्त्रीजीवनाच्या भागांनी झाली तर माझे अल्पसे श्रम कृतार्थ झाले असे मी समजेन.

स्त्री-जीवनाच्या पहिल्या भागात ज्या ज्या भगिनीपासून मी ओव्या घेतल्या त्यांचा नामनिर्देश करून मन:पूर्वक त्यांचे आभार मानले आहेत. या भागातील ओव्या त्यांचेजवळूनच घेतलेल्या. त्यांची नावे येथे देत नाही. त्यांचे पुन्हा कृतज्ञतापूर्वक स्मरण करतो म्हणजे झाले.

ठाणे येथे एकदा मी व्याख्यानार्थ गेलो होतो. व्याख्यानानंतर काही मंडळींशी मी बोलत बसलो होतो. एक तरुण म्हणाला, ''तुमच्या स्त्री-जीवनात.

''मानीयला भाई जातीचा मुसलमान
दिवाळीचा सण त्याचा कागदी सलाम.''

ही जी ओवी आहे ती खरोखर तुम्हाला मिळाली का?''

त्याचा प्रश्न ऐकून मला वाईट वाटले. एक तर खोटेपणाचा अप्रत्यक्ष मजवर आरोप येत होता; आणि दुसरी गोष्ट म्हणजे मुसलमान व हिंदू यांचे असे प्रेमळ व घरोब्याचे संबंध असणे त्याला अशक्य वाटत होते. केवळ कल्पनेतील वाटत होते.

मला नम्रपणे एवढेच सांगायचे आहे की, दोन्ही भागांतील ओव्या भगिनींच्या तोंडूनच मी ऐकल्या व लिहून घेतल्या. त्या मी रचिलेल्या नाहीत. माझ्या पदरच्या ओव्या मधूनमधून मी घातलेल्या नाहीत. मला ओव्या करायच्या झाल्या तर मी स्वतंत्रपणे त्या करीन व माझ्या नावाने प्रसिद्ध करीन. भगिनींच्या आड मी लपणार नाही; परंतु मी माझा प्रामाणिकपणा सिद्ध कसा करू? कितीतरी ओव्या देणाऱ्या मायबहिणी देवाघरी निघून गेल्या आहेत.

पुण्याच्या एका कॉलेजातील मराठीचे एक प्राध्यापक माझ्या ''पत्री'' या काव्यसंग्रहातील ''प्रेमधर्म'' या कवितेविषयी एकाजवळ बोलत होते. त्या कवितेत एका कुळंबिणीचे मूल आगगाडीत रडत असते. ती माता मुलाला उगी करू पाहते; परंतु मूल थांबत नाही. जवळ बसलेली एक गरीब मुसलमान माता त्या रडणाऱ्या मुलाला जवळ घेऊन खेळवू लागतेव त्याचे रडे थांबते. ती कुळंबीण जवळचे सुपारीचे खांड त्या मुसलमान बाईस कृतज्ञतेने देते, असा तो प्रसंग आहे; परंतु हे प्राध्यापक म्हणाले, ''सान्यांना तेथेही मुसलमान बाई घालावीशी वाटली!''

सान्यांनी ओढून ताणून घातली नाही. त्यांनी जे मनोहर प्रेमळ दृश्य आगगाडीत स्वत:च्या डोळ्यांनी पाहिले, ते वर्णिले. तेथे मुसलमान बाई होती, त्याला साने काय करतील? परंतु आजकाल हिंदू-मुसलमानांचे पवित्र व गोड संबंध असू शकतात ही गोष्टच आम्हाला अशक्य वाटू लागली आहे. मानवजातीसंबंधी केवढा हा द्रोह!

कोकणात माझी वहिनी मागील वर्षी मरण पावली. काही मुसलमान आयाबाया माझ्या भावाच्या समाधानासाठी आल्या होत्या. एकीने माझ्या भावाच्या लहान मुलीसाठी खाऊला रुपया दिला. एक मुसलमान बंधू आला व म्हणाला, ''फार वाईट झाले. तुमचा वजीरच गेला.'' पत्नी म्हणजे संसारातील सचिव. ''गृहिणी सचिव:' या कालिदासाच्या वाक्याची त्याने आठवण दिली. असे प्रेमळ संबंध अद्याप खेड्यापाड्यांतून आहेत. सुशिक्षित हिंदू-मुसलमान आपली द्वेषबीजे खेड्यापाड्यांतही नेतील व तेथील जीवनालाही मरणकळा आणतील, ती गोष्ट निराळी.

संकुचित सुशिक्षितांना काही वाटो. मी तर मांगल्यावर श्रद्धा ठेवणारा नम्र प्राणी आहे आणि जे जे मंगल मला दिसेल ते ते सर्वांसमोर लेखणीने, वाणीने ठेवण्याची मी खटपट करीन. ते कोणाला खोटे वाटले तर वाटो बापडे!

''सत्य असत्यासि मन केले ग्वाही''

असे श्री तुकाराम महाराजांनी म्हटले आहे. पहिल्या भागातील प्रकरणात घालण्यासारख्या आणखी ओव्या मिळाल्या आहेत. स्त्री-जीवनाच्या भागांची पुनरावृत्ती काढण्याचे प्रसंग आले, तर ह्या नवीन मिळालेल्या व इतर ओव्या त्यांतून मी घालीन. निरनिराळ्या मासिकांतून ओव्या प्रसिद्ध झालेल्या आहेत. त्यांच्या फाइली चाळून त्या ओव्या तपासल्या पाहिजेत आणि या भागांतून ज्या ओव्या आलेल्या

नसतील, त्या त्यातून घेऊन घातल्या पाहिजेत; परंतु हे काम पुढे केव्हा तरी करीन. आज मजजवळ जमलेल्या ओव्या महाराष्ट्रास देऊन मी या वेळेपुरता तरी मोकळा होत आहे. पहिल्या भागाप्रमाणे हा भागही सर्वांनी गोड करून घ्यावा अशी प्रार्थना आहे.

२७-११-१९४० **– साने गुरुजी**

मौखिक ओवी : एक टिपण

डॉ. रामचंद्र चिंतामण ढेरे

मराठी लोकसाहित्याच्या अध्ययनाला महाराष्ट्रात विद्यापीठीय प्रतिष्ठा मिळण्यास नुकताच प्रारंभ झाला आहे. अशा वेळी पू. साने गुरुजी यांनी रसपरिचयासह संपादिलेल्या 'स्त्री-जीवन' या ओवी गीतसंग्रहाची नवी आवृत्ती प्रकाशित होत आहे, याचा मला विशेष आनंद वाटतो. 'स्त्री-जीवन' हा संग्रह १९४० मध्ये दोन भागांत प्रकाशित झाला आणि त्यानंतर त्याच्या अनेक आवृत्त्या निघाल्या. त्यापूर्वी १९३८ मध्ये चोरघडे-कालेलकरांनी 'साहित्याचे मूलधन' प्रकाशित करून स्त्रीगीतांच्या, स्त्रीमुखीच्या ओवीगीतांच्या रसपरिचयाच्या प्रणालीचा पाया घातला होता; परंतु 'साने गुरुजींनी रसपरिचयाच्या मर्यादा एका व्यक्तीपासून वाढवून आणि काही वेळा अलग करून, संबंध कौटुंबिक वातावरण निर्माण केले. व्यक्तिजीवनाहून कुटुंबजीवन श्रेष्ठ व सुंदर आणि कुटुंबजीवनापेक्षा समाजजीवन उच्चतर अशा भावनेने त्यांनी ओव्यांची विभागणी करून वैयक्तिक कौटुंबिक व सामाजिक जीवनाचा कोपरान कोपरा भावनांच्या दीप्तींनी उजळून काढला.'' (लोकसाहित्याची रूपरेखा, पृष्ठ ५०५)

लोकगीतातील जे अंग सहज सुंदरतेने, नादानुकारितेने, रसमयतेने मंत्रित झाले होते, त्याची मोहिनी लोकसाहित्याच्या अध्ययनक्षेत्रात प्रथम कविवर रवींद्रनाथ ठाकुरांना पडली होती. त्यांनी लोकसाहित्याकडे, लोकगीतांकडे या रसिक दृष्टीने पाहिले. लोकसाहित्याकडे, विशेषत: स्त्रीगीतांपैकी ओवीगीतांकडे या हळव्या दृष्टीने पाहाण्यास गुरुजींची प्रकृती अत्यंत अनुकूल होती. दुर्गाबाईंच्या शब्दांत सांगायचे झाले तर, ''गुरुजींचे हळवेपण त्यांची श्रद्धा कुठल्याही स्त्रीला मागे हटवील इतकी स्त्रीनिष्ठ आहे. तिला कुठल्याच वाङ्मयात तोड नाही आणि म्हणूनच त्यांची शैली लोकप्रिय होऊन तिचे वारेमाप अनुकरण झाले व होते आहे, पण गुरुजींच्या लिखाणाने या विषयावरच विशेषत: ओवी किंवा लोकगीतावरच्या मांगल्यपूरित भावूकतेचा शेवटचा टप्पा गाठला आहे. भारतीय संस्कृतीच्या पूजकांनी लोकसाहित्य हे संस्कृतीचे गमक मानले व म्हणून लोकसाहित्यही आदर्श व मंगलमय अशा धारणा बाळगल्या गेल्या, टागोरांपासून ते साने गुरुजींपर्यंत हे सूत्र अबाधित राहिले व अजूनही त्यांचे शिष्यप्रशिष्य तेच करीत आहेत.''

गुरुजीच्या 'स्त्री-जीवन' च्या निर्मितीमागील प्रेरणा लोकसाहित्याच्या अभ्यासाची नव्हती, असे म्हटले तरच गुरुजींच्या न्याय मिळाल्यासारखे होईल. गुरुजींच्या भावपिंडाशी संवाद असे जीवनात, इतिहास आणि वाङ्मयात त्यांना जे जे आढळले, ते ते त्यांनी हळवेपणाने वेचले. सांभाळले, गौरविले. 'स्त्री-जीवना' च्या दुसऱ्या भागाच्या प्रस्ताविकेत त्यांनी स्वत:च म्हटले आहे की, ''मी तर मांगल्यावर श्रद्धा ठेवणारा नम्र प्राणी आहे आणि जे जे मंगल मला दिसले ते ते सर्वांसमोर लेखणीने, वाणीने ठेवण्याची मी खटपट करीन.'' या त्यांच्या विधानात त्यांची स्त्रीगीतांच्या संकलन-आस्वादनामागील मनोभूमिका अगदी नि:संदिग्ध स्वरूपात प्रकटली आहे.

याचाच अर्थ असा की, लोकसाहित्याची जी अंगे गुरुजींच्या भावपिंडाशी संवादी नव्हती. त्यांच्याकडे ते वळलेच नसते. एवढेच नव्हे, तर स्त्रीमुखींच्या ओवीगीतांमध्ये पतिबिंबित झालेल्या समाजजीवनाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करणे शक्य आहे, याचे भान असूनही ते तशा अभ्यासाच्या खटपटीत पटले नाहीत, ''माझे मित्र भाई गोरे या सर्व ओव्यांचा अभ्यास करून समाजस्थितिविषयक एक निबंध या दुसऱ्या भागात घालण्यासाठी देणार होते; परंतु त्यांना वेळ झाला नाही.'' अशी खंतही त्यांनी दुसऱ्या भागाच्या प्रास्तविकात नोंदविलेली आहे.

गुरुजींची ही भूमिका पाहाता 'स्त्री-जीवना'च्या प्रभावाने मराठी लोकसाहित्याच्या अध्यायनक्षेत्रात शास्त्रीय दृष्टीचा लोप होऊन 'गहिवर संप्रदाय' फोफावला, यात गुरुजींकडे मुळीच दोष जात नाही. महाराष्ट्रात ज्ञानप्रांतातील अनेक अज्ञात वाटा रुळविण्याचे प्रयत्न सुरू झाल्यावर राजवाडे, केतकर-चापेकर यांसारख्या ज्ञानमहर्षींनी लोकसंस्कृतीच्या अभ्यासाची शास्त्रीय दृष्टी पोसण्याचे महनीय कार्य केलेले असूनही, त्याचे विस्मरण जर पुढच्या पिढ्यांना पडले असेल, तर तो आपल्या करंटेपणाचा भाग आहे असे मानावे लागेल.

साने गुरुजींचा भावपिंड आणि त्याच्याशी संवादी अथवा विसंवादी वास्तव-यांच्यासंबंधी उदाहरण देऊन सांगायचे झाले तर पुढील दोन ओव्या पाहाव्या-

चैताच्या महिन्यात । देव जोतिबा वेडापिसा ।
पाठीच्या भैनीसंग । लगीन लावुनी गेला ।
चैताच्या महिन्यात । देव जोतिबा आवगला ।
पाठीच्या भैनीसंग । गेला लगीन लावायला ।

या ओव्या गुरुजींच्या मांगल्यनिष्ठेला उद्ध्वस्त करणाऱ्या ठरल्या असत्या; या ओव्यांच्या उपलब्धीने त्यांच्यासारख्या भावपिंडाला हादरे बसले असते; परंतु लोकसाहित्य हे लोकसंस्कृतीच्या अध्ययनाने प्रधान साधन आहे, या जाणिवेने त्यांचा अभ्यास करू पाहणाऱ्या मानवशास्त्रीय दृष्टीच्या या अभ्यासकाला मात्र या ओव्यांची उपलब्धी नि:संशय आनंददायी आहे; एका पुरातन युगातील समाजविषयाचे रहस्य उलगडण्यास उपकारक ठराणारी आहे. कित्येक सहस्त्रकांपूर्वीच्या जीवनाचा एक जिवंत अवशेष (living fossil) दाखविणारी आहे.

ओवीगीतांच्याच आणखी एका अलक्षित अंगाचे उदाहरण पोतराजांच्या मुखीच्या ओव्यांचे देता येईल. पोतराज या ओव्यांना 'वह्या' म्हणतात. वी, वई, ही 'ओवी' या संज्ञेचीच उच्चारभेदाने घडलेली रूपांतरे आहेत, हे उघड आहे.

आली आली मरीबया । कोण्या राजाला पावली ।
धजा मोत्याची लावली । धुरपताबाई ।

अशा थाटात पोतराज या वह्या गातो. ''यांची रचना ओव्यांसारखी असते. पोतराजांच्या या गीतांचे स्वरूप स्त्रीगीतांशी इतके मिळते जुळते आहे की, पोतराज स्त्रीगीतेच म्हणतात असे वाटते.'' असे या 'वह्यां'च्या संदर्भात डॉ. प्रभाकर मांडे यांनी म्हटले आहे. ('लोकसाहित्याचे अंत:प्रवाह', पृ. २७-२८) खरे तर यात आश्चर्य वाटण्याचे कारण नाही. पोतराज हा वेशांतराने 'स्त्री' बनलेला देवीचा उपासक असल्यामुळे त्याच्या मुखी स्त्रीगीते नांदणे हे त्याच्या भूमिकेशी संवादीच ठरते. वेशांतराने 'स्त्री' बनलेला पोतराज काय आणि लिंगच्छेदनाने 'स्त्री' बनलेला हिजडा काय, दोघेही मातृदेवतांच्या उपासनाक्षेत्रातील एका महान स्थित्यंतराचे जिवंत पुरावे आहेत. मातृदेवतांच्या उपासनाक्षेत्रात प्रथम केवळ स्त्रीचेच अनन्यसाधारण स्थान होते; पुरुषाला तिथे प्रवेश करण्यास संपूर्ण मज्जाव होता. जर पुरुषाने हा निषेध मोडला तर त्याचे स्त्रीत रूपांतर होईल, असे भयही होते. पुरुषाने हा निषेध मोडून मातृदेवतांच्या अधिष्ठानात प्रवेश मिळविला, तो स्त्री बनूनच! पुढे कालांतराने निषेधभयाचे कृष्णमेघ विरून गेले, तरी समाजजीवन युगानुयुगं, क्षीण स्वरूपात का होईना, त्या स्थित्यंतराचा अवशेष राहिला. वर्तमान दृष्टीला ओंगळ वाटणारा, हिडीस भासणारा! गुरुजींच्या मांगल्यमंत्रित दृष्टीला या अवशेषाचे अध्ययन मानवले नसते; पण शास्त्रीय दृष्टीच्या अभ्यासकांना त्यांचे स्वागतच करावे लागेल.

साने गुरुजींच्या ओवीगीतांच्या अध्ययनाची दृष्टी आणि त्यांचा वारस सांगणाऱ्या लोकसाहित्याच्या अभ्यासकांची झालेली फसगत यांची ही चर्चा थांबवून आपण आता ओवीच्या उगमाचा थोडा विचार करू.

'जात्यावर बसले की ओवी सुचते,' अशी एक म्हण आहे. या म्हणीतील लक्षणे काहीही असली, तरी जाते आणि ओवी यांचा संबंध तिच्यामध्ये निर्दिष्ट आहे, हे उघड आहे. स्त्रियांच्या मुखी असणारी ओवीगीते ही दळणकांडणाच्या वेळी, श्रम विस्मरणासाठी निर्माण झाली आहेत, याचा प्रत्यय चालू पिढीपर्यंत, निदान ग्रामीण जीवनात तरी आपण घेतलेला आहे. स्त्रियांच्या मौखिक ओवीचा आणि दळण-कांडणाचा संबंध आपणास इसवी सनाच्या सहाव्या शतकापासून अनुमानिता येतो. जैनांच्या बृहत्कल्प सूत्रभाष्यामध्ये आलेल्या पुढील प्राचीन उल्लेख प्रस्तुत संदर्भात महत्वाचा आहे-

जइ कुट्टिणीउ गायंति विस्स्मरं साइयाऊ मुसलेही ।
विलवंत सु सकलुणं हय हियय किमाकुलीभवसि ।।

(जिथे पीडित होऊन कुट्टिनी मुसळे घेऊन, कारुण्यपूर्ण गीते आळवून विस्वर म्हणत असतात तिथे हत हृदया, तू का आकुल होतोस?)

इथे स्त्रियांच्या कारुण्यपूर्ण गीतांचा आणि कांडणाच्या क्रियेचा संबंध स्पष्ट आहे. ही गीते ओवीगीतेच होती. असे मानायला या उल्लेखात आधार नसला, पुढे यादवकालापासून मिळणाऱ्या प्रमाणांमध्ये महाराष्ट्रातील स्त्रिया कांडणाच्या वेळी ओवीगीते गात असत, असे नि:संदिग्धपणे म्हटले आहे. सोमेश्वर नृपतीच्या 'मानसोल्लास या ग्रंथात (इसवी सनाचे अकरावे-बारावे शतक) स्त्रियांच्या मौखिक ओवीविषयी जे निर्देश आहेत, ते ओवीच्या उत्पत्तीवर विशेष प्रकाश टाकणारे आहेत-